It is to be distinctly understood that filing of circular in the form of advertisement with the Registrar should not in any way be deemed or construed that the same has been cleared or approved by the registrar or Central Government. The Registrar or Central Government does not take any responsibility either for the financial soundness of any deposit scheme for which the deposit is being accepted or invited or for the correctness of the statements made or opinions expressed in the circular in the form of advertisement. The depositors should exercise due diligence before investing in the deposit schemes.

This Circular is issued on the authority and in the name of Board of Directors of the Company of the text of which has been approved by them at their meeting held on 27th February, 2021 and a copy thereof duly signed by the majority of the Directors is delivered for registration to the Registrar of Companies, Chandigarh.

BY THE ORDER OF BOARD OF DIRECTORS
FOR BCL INDUSTRIES LIMITED

Sd/-
(Rajinder Mittal)
Managing Director
DIN: 00033082

Place: Bathinda (Punjab)
Date: 27th February, 2021

बँका, खासगी कार्यालयांनी वेळेची विभागणी करावी

मुख्यमंत्र्यांची सूचना

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



मुंबई : करोना उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर बँका, खासगी कार्यालये यांनी वेळेची विभागणी करून वेगवेगळ्या पाळ्यांमध्ये काम करावे. घरातून काम करण्याची कार्यपद्धती अवलंबावी. गर्दी आणि विविध यंत्रणांवरील ताण टाळण्यासाठी विशेष मार्गदर्शक तत्त्वे (एसओपी) सादर करण्याचे आदेश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बुधवारी दिले.

मुख्यमंत्र्यांनी दूरचित्र संवादाच्या माध्यमातून सनदी लेखापाल आणि कंपनी सचिवांसोबत संवाद साधला. त्यावेळी हे आदेश दिले. सनदी लेखापाल तसेच कंपन्यांमध्ये कामाच्या वेळांची विभागणी आणि कार्यप्रणालीत बदलाची एसओपी सादर करावी. जेणेकरून या दोन्ही क्षेत्रातील व्यावसायिकांना कामकाज करणे सुलभ होईल. तसेच ही एसओपी इतरांनाही मार्गदर्शक ठरेल, असे आदेश त्यांनी यावेळी दिले. यावेळी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटट ऑफ इंडियाचे अध्यक्ष निहार जंबुसरिया, इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरी ऑफ इंडियाचे अध्यक्ष नागेंद्र राव, पवन चांडक, दुर्गेश काबरा, देवेंद्र देशपांडे, देबाशीष मित्रा, नितीन दोशी आदी उपस्थित होते.

कठोर निर्बंधांचे जोरदार समर्थन

करोनाचे संकटच मोठे आहे. त्यामुळे अत्यंत नाइलाजास्तव कठोर निर्बंधांचा अप्रिय निर्णय घ्यावा लागला आहे. याची पूर्वकल्पना वारंवार देत आलो आहे. करोना वाढू नये याची खबरदारी घ्यावी लागेल. त्यासाठी करोना रोखण्यासाठी कठोर उपाय योजना कराव्याच लागतील असे सांगताना ही टाळेबंदी सरकारने नाही तर करोनाने केल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. टाळेबंदीचा परिणाम सगळ्यांवरच म्हणजे विकासकामांवर, लोकांच्या रोजीरोटीवर होतो याची जाणीव आहे. ही परिस्थिती लवकरात लवकर संपवायची आहे. पण मध्यंतरी आपण बेफिकीर झालो. त्यामुळे ही गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. आता उभ्या केलेल्या सुविधा अपुऱ्या पडतील, ऑक्सिजनचा तुटवडा होईल, अशी भीती आहे. रुग्णसंख्या वाढ रोखण्याठीच हे असे निर्बंध आणावे लागले आहेत, असे सांगत त्यांनी कठोर निर्बंधांचे जोरदार समर्थन केले.

करोना वाढीचा दर १.९१ टक्क्यांवर

मुंबईत १०,४२८ नवे रुग्ण, तर २३ जणांचा मृत्यू

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : मुंबईमधील करोना वाढीचा दर १.९१ टक्क्यांवर पोहोचला असून ही बाब पालिकेसाठी चिंतेची बनली आहे. दरम्यान, बुधवारी १० हजार ४२८ मुंबईकरांना करोनाची बाधा झाली आहे, तर २३ रुग्णांचा मृत्यू झाला.

गेल्या काही दिवसांपासून सातत्याने मुंबईत नव्या बाधित रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. बुधवारी १० हजार ४२८ जणांना बाधा झाल्यानंतर एकूण रुग्णसंख्या चार लाख ८२ हजार ७६० वर पोहोचली आहे. विविध रुग्णालयांमध्ये उपचार घेत असलेले १४ पुरुष आणि नऊ महिलांचा बुधवारी करोनामुळे मृत्यू झाला. यापैकी १६ जणांना दीर्घकालीन आजार होते. मृतांमधील एकाचे वय ४० वर्षांखालील तर १७ जणांचे वय ६० वर्षांवरील होते, तर उर्वरित पाच जण ४० ते ६० वयोगटातील होते. आतापर्यंत ११ हजार ८५१ मुंबईकरांना करोनामुळे प्राण गमवावे लागले.विविध रुग्णालयांमध्ये उपचार घेणारे ६,००७ रुग्ण बुधवारी करोनामुक्त झाले असून त्यांना रुग्णालयातून घरी पाठवण्यात आले.

आतापर्यंत तीन लाख ८८ हजार ०११ रुग्ण करोनामुक्त झाले आहे, मात्र रुग्ण करोनामुक्त होण्याचे प्रमाणही कमी होऊन ८० टक्क्यांवर स्थिरावले आहे. आजघडीला विविध रुग्णालयांमध्ये ८१ हजार ८८६ रुग्ण उपचार घेत आहेत. मुंबईमधील रुग्णदुपटीचा कालावधी सरासरी ३५ दिवसांवर घसरला आहे, तर रुग्णवाढीच्या दराने १.९१ टक्क्यांवर उसळी घेतली आहे. करोनाबाधित रुग्णांचा शोध घेण्यासाठी बुधवारी तब्बल ५१ हजार २६३ चाचण्या करण्यात आल्या.

१,०३७ जणांचे संस्थात्मक विलगीकरण

करोनाबाधित रुग्णांच्या संपर्कात आलेल्या अतिजोखमीच्या गटातील ३५ हजार ८४० संशयित रुग्णांचा शोध घेण्यात आला असून यापैकी १,०३७ संशयित रुग्णांना संस्थात्मक विलगीकरण कक्षात ठेवण्यात आले आहे, तर उर्वरित संशयित रुग्णांना अटीसापेक्ष गृहविलगीकरणात राहण्याची परवानगी देण्यात आली आहे.

ठाणे जिल्ह्यात ६,२९० करोना रुग्ण

ठाणे : ठाणे जिल्ह्यात बुधवारी ६ हजार २९० करोना रुग्ण आढळून आले. तर २१ जणांचा करोनामुळे मृत्यू झाला. त्यामुळे जिल्ह्यातील करोनाबाधितांची संख्या ३ लाख ५६ हजार २६७ झाली असून मृतांची संख्या ६ हजार ६२० झाली आहे. जिल्ह्यातील ६ हजार २९० करोना रुग्णांपैकी कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रात १ हजार ७२८, ठाणे महापालिका क्षेत्रात १ हजार ६१९, नवी मुंबईत १ हजार ४१६, मीरा-भाईंदर ५२२, अंबरनाथ ३०४, बदलापूर २४०, उल्हासनगर १७३ भिवंडी १४८ आणि ठाणे ग्रामीणमध्ये १४० रुग्ण आढळून आले. तर २१ जणांचा बुधवारी मृत्यू झाला. यात ठाणे पाच, नवी मुंबई चार, कल्याण-डोंबिवली तीन, मीरा-भाईंदरमध्ये तीन, उल्हासनगर दोन, भिवंडी दोन, अंबरनाथ एक आणि बदलापुरातील एका रुग्णाचा समावेश आहे.

मटण, अंडी, कोंबड्या, मासे विक्रीची दुकाने सुरू

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई: राज्यातील वाढत्या करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेल्या निर्बंधातून बुधवारी कोंबडी, मटण, अंडी, मासे विक्रीची दुकाने तसेच कुक्कुटपालन यांना सूट देण्यात आली असून त्यांचा समावेश अत्यावश्यक सेवेमध्ये करण्यात आला आहे.

सरकारने राज्यात करोना नियंत्रणासाठी कठोर निर्बंध लागू केले आहेत. मात्र लोकांची गरज लक्षात घेऊन काही घटकांना निर्बंधमुक्त करण्यात आले आहे. मदत आणि पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता यांनी याबाबतचा आदेश निर्गमित के ला आहे. त्यानुसार सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी काही अटींसह सर्व प्रासंगिक सेवांसह सार्वजनिक वाहतुकीला परवानगी देण्यात आली आहे. यामध्ये विमानतळावर आवश्यक त्या मालमत्तेची हाताळणी, तिकिटिंग इत्यादी आनुषंगिक सेवांचा समावेश आहे. तसेच परवानगी असलेल्या उत्पादनांच्या उत्पादन प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या सर्व आनुषंगिक कामांना परवानगी देण्यात आली आहे. तसेच उत्पादन प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी आवश्यक असलेल्या तसेच तयार झालेले उत्पादन पाठविण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्रे, कार्यालयीन प्रक्रियेलासुद्धा परवानगी देण्यात आली आहे. ५००पेक्षा जास्त कामगार असणाऱ्या उद्योगांनी आपल्या कामगारांसाठी सर्व सुविधायुक्त विलगीकरण केंद्र उभारावे. ज्या उद्योगांनी अशी सुविधा आपल्या उद्योगाच्या आवारात किंवा बाहेर केली असेल त्यांनी संक्रमित कर्मचाऱ्यास त्या ठिकाणी हलविताना तो अन्य कोणाच्या संपर्कात येणार नाही याची दक्षता घ्यावी असे आदेशही देण्यात आले आहेत.

शेतीशी निगडित बियाणे, खते, उपकरणे आणि त्यांची दुरुस्ती यांना परवानगी देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सेबीने मान्यता दिलेल्या स्टॉक एक्सचेंजेस, डिपॉझिटरीज, क्लियरिंग कॉर्पोरेशन तसेच सेबीकडे नोंदणीकृत इतर मध्यस्थ अशा शेअर बाजारातील मूलभूत सुविधा संस्थांनी त्यांचे व्यवहार सुरू ठेवण्यास परावनगी देण्यात आली आहे.

मध्य रेल्वेच्या ५ कर्मचाऱ्यांचा करोनाने मृत्यू

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातील पाच कर्मचाऱ्यांचा गेल्या चार-पाच दिवसांत करोनाने मृत्यू झाला आहे. त्यामध्ये दोन लोको पायलट, दोन गार्ड आणि एका कर्मचाऱ्याचा समावेश आहे, तर एसटी महामंडळाच्या राज्यभरातील ५१ कर्मचाऱ्यांना बुधवारी करोनाची लागण झाली आहे.

करोनाच्या पहिल्या लाटेत अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना मोठ्या प्रमाणात संसर्ग झाला होता. आता पुन्हा करोनाने डोके वर काढले आहे. या वेळी पुन्हा अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना मोठ्या प्रमाणावर करोनाची लागण होताना दिसत आहे. गेल्या चार-पाच दिवसांत मध्य रेल्वेच्या पाच कर्मचाऱ्यांचा करोनाने मृत्यू झाला आहे, तर गेल्या वर्षभरात करोनामुळे मध्य रेल्वेच्या ४८ कर्मचाऱ्यांचा मृत्यू ओढवला आहे. आतापर्यंत १०५१ कर्मचाऱ्यांना करोनाची लागण झाली असून सध्या ३५ कर्मचाऱ्यांवर उपचार सुरू आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

एसटीच्या ५१ कर्मचाऱ्यांना लागण

एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनाही करोनाची लागण होताना दिसते आहे. बुधवारी एसटीच्या राज्यातील ५१ कर्मचाऱ्यांना करोनाची लागण झाली असून त्यामध्ये मुंबईतील चार कर्मचाऱ्यांचा समावेश आहे, तर धुळे येथील १६ कर्मचाऱ्यांना करोनाची लागण झाली आहे. आतापर्यंत एसटीच्या ५,४६१ कर्मचाऱ्यांना लागण झाली आहे. यातील १२८ कर्मचाऱ्यांचा करोनाने मृत्यू झाला आहे.



टाटा मेमोरियल सेंटर

(अणुऊर्जा विभाग, भारत सरकारअंतर्गत एक अनुदानित संस्थान)
डॉ. अ. बोर्जेस मार्ग, परेल, मुंबई - ४०००१२

आमच्या परेल-शिवडी विभाग, जी. डी. आंबेडकर मार्ग, परेल, मुंबई, महाराष्ट्र येथील सीटी सर्व्हे नं. ३/३३० भूखंडावरील टाटा मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल, डॉक्टरांकरिता निवासस्थाने आणि टाटा मेमोरियल सेंटरकरिता धर्मशाळा या प्रकल्पाला पर्यावरण आणि जलवायू परिवर्तन विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडून पर्यावरणविषयक मंजुरी देण्यात आली आहे.

सदर पर्यावरणविषयक मंजुरीची प्रत केंद्रीय पर्यावरण, वन आणि जलवायू मंत्रालय, भारत सरकार यांच्या http://environmentclearance.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

D G ACADEMY (IAS)

Institute for Competitive Exams

D G Educational Campus, Behind D'Mart, G.B.Road, Thane (W) - 400615.

Coaching for UPSC, MPSC and Staff Selection Commission (SSC)

Regular Batches Monday to Friday | Weekend Batches Saturday & Sunday

Residential Facility Available

For Registration: Offline / Online

https://forms.gle/4wi27NVU16EcnTtm7

www.dgetcollege-edu.org | Email: dgacademy2021@gmail.com

Contact: 7738015222/022-25973187

— पाहिजेत —

सर्वाधिक वेगाने विस्तार होत असलेल्या महाराष्ट्रातील एका नामांकित मल्टिक्रोर टर्नओव्हर कंपनीच्या मुंबई स्थित मराठी कॅलेंडर (दिनदर्शिका) व पंचांग निर्मिती युनिटसाठी मुंबई, उत्तर-महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, पश्चिम-महाराष्ट्र, कोकण, उत्तर-कर्नाटक व गोवा या ठिकाणी खालील स्टाफ व वितरक (डिस्ट्रिब्युटर्स) त्वरित नेमावयाचे आहेत.

- युनिट मॅनेजर (जागा १) ■ मॅनेजर मार्केटिंग (जागा ४)
- प्रॉडक्शन मॅनेजर (जागा १) ■ मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह (जागा १०)

पदवी/पदव्युत्तर, वयोमर्यादा पदानुसार ३०-४५, कॅलेंडर निर्मिती व वितरण क्षेत्रातील अनुभव असल्यास विशेष प्राधान्य. (वरील स्टाफ उमेदवारांना शैक्षणिक पात्रता व अनुभवानुसार योग्य वेतन व इतर भत्ते दिले जातील.)

- कॅलेंडर डिस्ट्रिब्युटर्स

महाराष्ट्र, उत्तर-कर्नाटक आणि गोवा येथील सर्व जिल्ह्यांकरिता वितरक नेमणे आहे. कॅलेंडरची विक्री करणेचा अनुभव आवश्यक. वितरण व विक्री व्यवस्थेसाठी आवश्यक यंत्रणा व मनुष्यबळ उपलब्ध असावे. अनामत रक्कम भरणेची तयारी असावी.

इच्छुकांनी खालील मेल आयडीवर सात दिवसांच्या आत अर्ज पाठवावेत.

ashishagarwal1155@gmail.com

कुळगांव बदलापूर नगर परिषद

नगर परिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व) कुळगाव, पिन-४२१५०३, ता. अंबरनाथ, जि. ठाणे

ईमेल :- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in
वेबसाइट :- http://kbmc.gov.in

जा. क्र: कुबनप/साबां/२९५४/२०२१-२२ दिनांक : ०७.०४.२०२१

जाहीर ई-निविदा सूचना क्र. 04/2021-22

कुळगांव-बदलापूर नगर परिषदेच्या बांधकाम विभागामार्फत कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा संच विक्री व स्वीकृतीचा कालावधी दि. ०८.०४.२०२१ ते दि. १५.०४.२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत आहे व सदर निविदा दि. १६.०४.२०२१ रोजी दुपारी १२.०० नंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगर परिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर व नगर परिषदेच्या सूचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

सही/-
शिक्का
(दीपक पुजारी)
मुख्याधिकारी तथा प्रशासक
कुळगांव बदलापूर नगर परिषद

सूचना

जनकल्याण सहकारी बँक मर्यादित भविष्य निर्वाह निधी

जनकल्याण सहकारी बँक लि. प्रॉव्हिडंट फंड आणि जनकल्याण सहकारी बँक लिमिटेडच्या व्यवस्थापन संस्थेच्या विश्वस्तांनी जनकल्याण बँक लि. भविष्य निर्वाह निधी ("ट्रस्ट") च्या दिनांक ३० एप्रिल २०२१ पर्यंत प्रॉव्हिडंट ट्रस्ट आणि फंड कॉर्पसकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतल्याची सूचना दिली आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना (ईपीएफओ) वाशी, नवी मुंबई, दिनांक १ मे २०२१ सर्व माजी कर्मचारी किंवा त्यांचे कायदेशीर वारस (सदस्य हयात नसल्यास) ज्यांनी अद्याप ट्रस्टकडून त्यांचे भविष्य निर्वाह निधी मागे घेतलेले नाही त्यांना कार्मिक विभाग, मुख्यालय, चेंबूर येथे लँडलाईन क्रमांकावर संपर्क साधावा ०२२ - २५२६४११६/११७. दिनांक १७ एप्रिल २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी आणि त्यांची ओळख / कायदेशीर वारस प्रमाणपत्र इत्यादींची पुष्टी करणाऱ्या कागदपत्रांसह विहित नमुन्यात भविष्य निर्वाह निधी परत घेण्यासाठी अर्ज करावा. दिनांक १७ एप्रिल २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी या कर्मचाऱ्यांकडून कोणताही अर्ज न मिळाल्यास संपूर्ण भविष्य निर्वाह निधी कॉर्पस ईपीएफओ वाशी, नवी मुंबई येथे वर्ग केला जाईल.भविष्य निर्वाह निधी ईपीएफओ वाशीकडे हस्तांतरित करण्याच्या प्रक्रियेदरम्यान, भविष्य निर्वाह निधी दावे निकालात काढणे, सदस्य / कायदेशीर वारसांकडून कोणताही अर्ज ट्रस्टद्वारे स्वीकारला जाणार नाही. एकदा हा निधी ईपीएफओ वाशीला हस्तांतरित झाल्यानंतर संबंधित सर्व भविष्य निर्वाह निधी दाव्यांची पूर्तता ईपीएफओ वाशीद्वारे केली जाईल आणि दावेदाराला भविष्य निर्वाह निधी दावा निकाली काढण्याचा अर्ज फक्त ईपीएफओ वाशीला करावा लागेल.

दिनांक : ८ एप्रिल २०२१
स्थान : मुंबई
सही / -
मुख्य कार्यकारी अधिकारी

SALE NOTICE

VALECHA LM TOLL PRIVATE LIMITED (IN LIQUIDATION)

Regd. Office.: Valecha Chambers, 4th Floor New Link Road, Andheri (W), Mumbai-400053.
(CIN - U74900MH2010PTC202289)

Notice is hereby given to the public in general in connection with sale of the Company, Valecha LM Toll Private Limited (in liquidation) ("Corporate Debtor") as a going concern, offered by the Liquidator appointed by the Hon'ble NCLT, Mumbai Bench vide order MA No. 171/MB/2020 in C.P. (IB) No. 2498/2018 dated October 27, 2020 under The Insolvency and Bankruptcy Code, 2016 ("Code").

The Corporate Debtor is being offered for sale as a Going Concern as per Regulation 32(e) read with Regulation 32A of the Insolvency and Bankruptcy Board of India (Liquidation Process) Regulations, 2016. The bidding shall take place through online e-auction service provider Linkstar Infosys Private Limited at https://eauctions.co.in/

SR. NO.	PARTICULARS	DETAILS
1	Date and Time of Auction	**Date:** April 21, 2021 **Time:** 11:00 a.m. to 04:00 p.m.
2	Address and e-mail of the Liquidator, as registered with IBBI	**Reg. Address:** Sumedha Management Solutions Private Limited, C703, Marathon Innova, Off Ganapatrao Kadam Marg, Lower Parel West, Mumbai, Maharashtra, 400013. **Reg. Email Id:** udayraj_patwardhan@sumedhamanagement.com
3	Process specific address for correspondence	Sumedha Management Solutions Private Limited 809-810, B-Wing, 8th floor, Trade World, Kamala Mills Compound, Lower Parel (West), Mumbai 400013. **E-mail Id:** vlmtpl@sumedhamanagement.com

Assets	Reserve Price	Earnest Money Deposit
Sale of Corporate debtor as going concern along with all its assets including concession rights, land, plant and machinery and current assets, excluding Cash and Bank Balance.	Rs. 93.28 Crores (Rupees Ninety Three Crores and Twenty Eight Lakhs Only)	Rs. 9.3 Crores (Rupees Nine Crore and Thirty Lakhs Only)

Important Notes:

1. The Corporate Debtor operates toll road of 34 Kms, Four Laning Road of Lebad (SH-31) to Manpur (NH-3), in Indore/Dhar district, Madhya Pradesh on Build-Operate-Transfer (BOT) basis by virtue of Concession Agreement with **Madhya Pradesh Road Development Corporation Ltd.** which is valid till November 18, 2035.
2. The sale shall be on "AS IS WHERE IS", "AS IS WHAT IS", "WHATEVER IT IS", "WHATEVER THERE IS" and "WITHOUT RECOURSE BASIS" and as such, the sale shall be without any kind of warranties and indemnities.
3. The details of the process and timelines are outlined in the E-Auction Process Document, which is available on the website of e-auction service provider Linkstar Infosys Private Limited at https://eauctions.co.in/
4. Interested bidders shall participate after **mandatorily** reading and agreeing to the relevant terms and conditions including as prescribed in E-Auction Process Documents and accordingly, submit their expression of interest in the manner prescribed in E-Auction Process Document.
5. The Liquidator has the absolute right to accept or reject any or all offer(s) or adjourn/ postpone/cancel the e-Auction or withdraw any assets thereof from the auction proceeding at any stage without assigning any reason thereof.
6. As per proviso to clause (f) of section 35 of the Code, the interested bidder shall not be eligible to submit a bid if it fails to meet the eligibility criteria as set out in section 29A of the Code (as amended from time to time).

Date and Place: April 07, 2021, Mumbai

Sd/-
Udayraj Patwardhan
IBBI/IPA-001/IP-P00024/2016-17/10057
Liquidator of Valecha LM Toll Pvt Ltd (in liquidation)

सार्वजनिक सूचना

याद्वारे सूचना देण्यात आली आहे की मे. हरीश अँड कंपनी यांच्या अनुसूचित मालमत्तेच्या संदर्भात (जीचे खाली दिलेल्या अनुसूचिमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केले आहे) मालकी हक्कांचे अन्वेषण आमचा पक्षकार योग्य ती काळजी घेण्याची आमची प्रक्रिया म्हणून करीत आहे. मालकाने आम्हाला आणि आमच्या पक्षकाराला प्रस्तुत केले आहे की ते खालील अनुसूचिमध्ये वर्णन करून लिहिलेल्या अचल मालमत्तेचे एकमात्र आणि परिपूर्ण मालक आहेत आणि अनुसूचित मालमत्ता मालकी हक्काच्या संदर्भातील सर्व प्रकारच्या भारांपासून आणि/किंवा दोषांपासून मुक्त आहे.

सर्व व्यक्ती / हक्क असलेल्या संस्था, मालकी हक्क, दावा, लाभ, मागणी, किंवा त्याबाबतीत हितसंबंध किंवा त्या मालमत्तेत, त्या मालमत्तेसाठी, त्या मालमत्तेवर, आणि / किंवा कोणत्याही प्रकारचा जो कोणता असेल तो भार प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या असलेल्या अनुसूचित मालमत्तेच्या मालकी हक्काच्या संदर्भातील किंवा त्या संदर्भातील मालमत्तेचा कोणताही भाग, विक्री विनिमय, भाड्याने दिलेला, भाडेपट्टा, परवाना, असाइनमेंट, भाडेकरू वहिवाट, गहाणखत, नजरगहाण, वारसा, मृत्युपत्रानुसार देलेली देणगी, वारसाहक्क, बक्षीस, धारणाधिकार, भार-बोजा, देखभाल, वहिवाटीचा हक्क, परवाना, विश्वस्त, ताबा, कौटुंबिक व्यवस्था / वसाहत, कोणत्याही न्यायालयाचे फर्मान किंवा हुकूमनामा, सौदे / करार, विकास हक्क, भागीदारी किंवा इतर जे काही स्वरूप आहे, यांच्या समावेशासह परंतु इथपर्यंत मर्यादित नाही, अशांनी लेखी स्वरूपात दस्तऐवजांच्या **पुराव्यांसह या सार्वजनिक सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ७ (सात) दिवसांच्या आत** खाली नमूद केलेल्या पत्त्यावर किंवा ईमेल आयडीवर हे ज्ञात करून देणे आवश्यक आहे. अशा प्रकारचा कोणताही दावा प्राप्त न झाल्यास, असा कोणताही दावा अस्तित्वात नाही किंवा अस्तित्वहीन आहे किंवा माफ केला आहे किंवा सोडून दिला गेला आहे असे मानले जाईल.

अनुसूची

मालमत्तेचे वर्णन	मालकाचे वर्णन
जमीन गाव पहाडी येथे स्थित, गोरेगांव, बृहन्मुंबई, नोंदणी आणि उप-जिल्हा मुंबई शहर आणि मुंबई उप-शहर यांचे सीमेत, गाव पहाडीमधील सिटीएस क्र. २६८ (भाग), विश्वेश्वर नगर, गोरेगांव (पूर्व), मुंबई- ४०००६३ महाराष्ट्र, क्षेत्रफळ १७३०.७८ (एक हजार सातशे तीस पूर्णांक अठ्याहत्तर) चौरस मीटर्स किंवा त्याप्रमाणे, सीमा खालीलप्रमाणे परिबंधित: **पूर्व :** सिटीएस क्र. २७२ **पश्चिम:** नगरपालिका रस्ता **उत्तर :** सिटीएस क्र. २६८(भाग) **दक्षिण :** सिटीएस क्र.२५८, सिटीएस क्र. २६६ आणि सिटीएस क्र. २६७	मे. हरीश अँड कंपनी, १० ऑक्टोबर, २०१४ रोजी कंपनीच्या रजिस्ट्रारकडे नोंदणीकृत भागीदारी कंपनी, जिचा स्थायी खाते क्रमांक एएजीएफएच११९३के आहे आणि कार्यालय गाव पहाडीमधील सिटीएस क्र. २६८ (भाग), गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०००६३ येथे आहे.

८ एप्रिल, २०२१ रोजी दिनांकित केले

इक्बाल ताहीर, अधिवक्ता
दुआ असोसिएट्स, सॉलीसिटर्स अँड ॲडव्होकेट्स
७०४ - ७०५, ग्लोबल बिझिनेस पार्क टॉवर 'बी'
मेहरौली - गुरगाव रोड
गुरगाव - १२२ ००२
इमेल आयडी: iqbaltahir@duaassociates.com

आयनॉक्स लिजर लिमिटेड

INOX LIVE the MOVIE

(सीआयएन: एल९२१९९एमएच१९९९पीएलसी३५३७५४)
नोंदणीकृत कार्यालय : पाचवा मजला, विराज टॉवर्स, अंधेरी उड्डाण पुलाच्या बाजूला, पश्चिम द्रुतगती मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००९३.
दूरध्वनी: (+९१ २२) ४०६२६९०० **फॅक्स:** (+९१ २२) ४०६२६९९९
संकेतस्थळ: www.inoxmovies.com **ई-मेल:** contact@inoxmovies.com

टपाली मतदानाची आणि मतदान माहितीची सूचना

सूचना ह्याद्वारे देण्यात येत आहे की कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ११० (`कायदा`) सह वाचिता, कंपनी (प्रशासन आणि व्यवस्थापन) नियामवली, २०१४ च्या नियम २० आणि २२ (`नियम`) सह वाचिता कंपनी व्यवहार मंत्रालयाद्वारे ("एमसीए") जारी करण्यात आलेल्या सामान्य परिपत्रक क्र. १४/२०२० दिनांकित ८ एप्रिल, २०२०, परिपत्रक क्र. १७/२०२० दिनांकित १३ एप्रिल २०२०, परिपत्रक क्र. २२/२०२० दिनांकित १५ जून २०२०, परिपत्रक क्र. ३३/२०२० दिनांकित २८ सप्टेंबर २०२० आणि परिपत्रक क्र. ३९/२०२० दिनांकित ३१ डिसेंबर २०२० (ह्यानंतर संयुक्तपणे "एमसीए परिपत्रके" असा संदर्भ असलेल्या) आणि लागू असलेल्या सेबी परीपत्रकासह सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिसक्लोझर रिक्वायरमेंटस), नियमावली २०१५ च्या नियम ४४ मान्यतेच्या अनुसार, कोणत्याही संवैधानिक फेरफार किंवा सध्या वापरात असलेल्या ("लिस्टिंग नियमावली") मधील फेरफार ह्यांच्या नुसार टपाली मतदान सूचना दिनांकित ६ एप्रिल २०२१ ("सूचना") मध्ये नमूद करण्यात आलेल्या खालील विशेष ठरावावर केवळ दूरस्थ ई-मतदानाच्या द्वारे आयनॉक्स लिजर लिमिटेड ("दि कंपनी") च्या सभासदांची संमती प्राप्त करण्यात येणार आहे.

बाब क्र.	ठरावाचे स्वरूप
१	सम भाग/ अन्य सिक्युरिटीज रु. ३०० कोटी पर्यंत विचार करून वितारणासाठी प्राधिकृत करणे.

एमसीए परिपत्रकाच्या मान्यतेच्या अनुसार, कंपनीने, बुधवार, ३१ मार्च २०२१ ("कट ऑफ दिनांक") अनुसार समभाग धारणा करणाऱ्या कंपनीच्या सभासदांना स्पष्टीकरण निवेदनाच्या सोबत सूचना ई-मेल द्वारे पाठविण्याचे काम ७ एप्रिल, २०२१ रोजी पूर्ण केले आहे. कट ऑफ दिनांकाच्या नुसार सभासदांच्या नावे नोंद असलेल्या सम भागांच्या भरणा करण्यात आलेल्या मूल्याच्या प्रमाणामध्ये मतदानाचे अधिकार निश्चित करण्यात येईल. व्यक्ती, जी कट ऑफ दिनांकाच्या अनुसार सभासद नाही त्यांनी सूचना केवळ माहितीसाठी असल्याचे समजावे.

एमसीए परिपत्रकाच्या मान्यतेच्या अनुसार सदर टपाली मतदानासाठी टपाली मतदान पत्रिका आणि प्री- पेड बिझनेस एन्व्हलपसह सूचनेची प्रत्यक्ष प्रत सभासदांना पाठवली जाणार नाही. सभासदांच्या सहमती किंवा असहमतीच्या संदर्भात असलेले संप्रेषण केवळ दूरस्थ ई-मतदान प्रणालीद्वारेच घेण्यात येईल.

सभासदांनी कृपया नोंद घ्यावी की सूचना कंपनीच्या संकेतस्थळावर www.inoxmovies.com वरील `इन्व्हेस्टर रिलेशन्स` ह्या विभागाच्या अंतर्गत उपलब्ध आहे आणि तसेच स्टॉक एक्सचेंजच्या म्हणजेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या संकेतस्थळांवर म्हणजेच www.bseindia.com आणि www.nseindia.com वर अनुक्रमे उपलब्ध आहे. त्याच प्रमाणे सीडीएसएल च्या www.evotingindia.com ह्या संकेतस्थळावर देखील सूचना उपलब्ध आहे.

नियमाच्या सह वाचल्या जाणाऱ्या कायद्याच्या कलम १०८, लिस्टिंग नियमावली आणि एमसीए परीपत्रकाच्या मान्यतेच्या अनुसार सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या व्यवसायाच्या संदर्भात कंपनी त्यांच्या सभासदांना दूरस्थ ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून देत आहे. सभासदाच्या द्वारे दूरस्थ ई- मतदानाच्या द्वारे मतदान करण्याची सुविधा सेन्ट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड ("सीडीएसएल") ह्या अधिकृत ई-मतदान संस्थेद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

नोटीस इलेक्ट्रॉनिक स्वरूपामध्ये प्राप्त होण्यासाठी आणि इलेक्ट्रॉनिक स्वरूपामध्ये मतदान करण्यासाठी ई-मेल आयडीच्या तात्पुरत्या नोंदणीकरणाची प्रक्रीया (जर ई-मेल आयडीची नोंद केलेली नसल्यास):

ए. प्रत्यक्ष स्वरूपामध्ये समभाग धारणा करणाऱ्या समभाग धारकांसाठी – आवश्यक माहिती जसे की फोलियो क्र., सभासदाचे नाव, भाग प्रमाणपत्राची स्कॅन प्रत (पुढील आणि मागची बाजू), पॅन (स्वसाक्षांकीत स्कॅन प्रत), आधार (स्वसाक्षांकीत स्कॅन प्रत), ह्याचा तपशिल कंपनीला investors@inoxmovies.com वर किंवा आरटीए ह्याना einward.ris@kfintech.com वर ई-मेल द्वारे पाठवावे.

बी. अप्रत्यक्ष स्वरूपामध्ये समभाग धारणा करणाऱ्या समभाग धारकांसाठी – कृपया डिमॅट खाते तपशिल (सीडीएसएल – १६ अंकी लाभार्थी आयडी किंवा एनएसडीएल – १६ अंकी डीपीआयडी + सीएलआयडी), नाव, क्लायंट मास्टर, किंवा एकत्रिकृत खाते निवेदन, पॅन (स्वसाक्षांकीत स्कॅन प्रत), आधार (स्वसाक्षांकीत स्कॅन प्रत) ह्याचा तपशिल कंपनीला investors@inoxmovies.com वर किंवा आरटीए ह्याना einward.ris@kfintech.com वर ई-मेल द्वारे पाठवावे.

हे स्पष्ट करण्यात येत आहे की कायमस्वरूपी नोंदणी करण्यासाठी, सभासदांना ज्यांनी त्यांच्या ई-मेल आयडी नोंदविलेला/ अपडेट केलेला नाही त्यांना त्यांच्या ई-मेल आयडीची नोंद/ अपडेट त्यांच्या डिपॉझिटरी पार्टीसिपंट ह्यांच्याकडे करण्याची विनंती करण्यात येत आहे. सभासद ज्यांनी प्रत्यक्ष स्वरूपात भाग धारणा केली आहे त्यांना विनंती करण्यात येत आहे की त्यांनी त्यांच्या ई-मेल आयडीची नोंद रजिस्ट्रार अँड शेअर ट्रान्सफार एजंटस (आरटीए) ह्यांच्याकडे einward.ris@kfintech.com वर ई-मेल करून पाठवावे.

सूचनेमध्ये टपाली मतदान/ ई-मतदानाचा तपशिल देण्यात आलेला आहे. तथापि, सभासदांना खाली देण्यात आलेल्या तपशिलाची नोंद घेण्याची विनंती करण्यात येत आहे:

अनु. क्र.	विवरण	तपशिल
१.	ई-मतदानासाठी लिंक	www.evotinginida.com ई-मतदानाची प्रक्रीया समजून घेण्यासाठी सभासदाना विनंती करण्यात येत आहे की त्यांनी टपाली मतदान सूचनेमधील टिपा वाचाव्यात.
२.	ई-मतदानासाठी पात्रतेसाठी कट ऑफ दिनांक	बुधवार, ३१ मार्च २०२१
३.	ई-मतदान कालावधी	- शनिवार, १० एप्रिल २०२१ रोजी स. ९:०० वा. भाप्रवे सुरु होईल. - रविवार, ९ मे २०२१ रोजी सायं. ५.०० वा. भाप्रवे समाप्त होईल. (दोन्ही दिवसांसह) टिप: उपरोक्त नमूद दिनांक आणि वेळेच्या नंतर मतदान करता येणार नाही.
4.	छाननीकर्ते तपशिल	श्री. सत्यनारायण समदानी [सभासद क्र. एफसीएस ३६७७ आणि सीपी: २८६३], मे. समदानी शाह अँड काबरा, कार्यरत असलेले कंपनी सचिव.
5.	ई-मतदानाचा निकाल प्रसिद्ध करण्यासाठी शेवटचा दिनांक	टपाली मतदानाचा निकाल मंगळवार, ११ मे २०२१रोजी किंवा त्यापूर्वी जाहीर करण्यात येईल. जाहीर झालेला निकाल छाननीकर्त्याच्या अहवालासह कंपनीच्या www.inoxmovies.com ह्या संकेतस्थळावर आणि सीडीएसएल च्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल आणि बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड ला कळविण्यात येईल.

ई-मतदानाच्या संदर्भात जर तुम्हाला कोणतीही समस्या असल्यास www.evotingindia.com वरील ई- मतदान मॅन्युअल/ फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स ("एफएक्यू") चा संदर्भ घेता येईल किंवा helpdesk.evoting@cdslindia.com वर मेल करा किंवा श्री. नितीन कुंदर (०२२-२३०५८७३८) किंवा श्री. राकेश दळवी (०२२-२३०५८५४२) वर किंवा निम्नस्वाक्षरीकार ह्यांच्याशी संपर्क करा.

संचालक मंडळाच्या आदेशाच्या द्वारे
आयनॉक्स लिजर लिमिटेड करीता

पार्थसारथी अय्यंगार
कंपनी सचिव
ई-मेल आयडी: parthasarathy.iyengar@inoxmovies.com
दूरध्वनी: ०२२ – ४०६२ ६९००
पत्ता: विराज टॉवर्स, पाचवा मजला, अंधेरी उड्डाण पुलाच्या बाजूला, पश्चिम द्रुतगती मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००९३.

ठिकाण: मुंबई
दिनांक: ७ एप्रिल,२०२१